(वेध गीत -२००४)

# सवयीच्या सुपर हायवेवर

नवीन रस्ता शोधत-खोदत माझे “मी” पण भेटे //
हसणाऱ्या चेहऱ्यांवर आता आदरकौतुक दाटे
अनुभव अपुले दुसऱ्यांसाठी, मुक्तपणे वाटावे.
यशकिर्तीच्या शिखरावर, ज्ञानाची दिवली तेवे
वाट आमुची म्हणणाऱ्यांचा, ओघच जणू अथांग
मुक्कामावर वळून पहावे, जमू लागते रांग

नवीन रस्ता शोधत-खोदत माझे “मी” पण भेटे //
मस्तीमध्ये प्रवास सरतो, ध्येय ऊरीचे मोठे
पुन्हा अेकदा उंच स्वराने नवीन घ्यावी तान.
अशात यावा हात मदतीचा सूर जमावे छान
असह्य व्हावे अेकाकीपण, उत्साहाला ओहोटी
तुच्छ टीकेच्या नजरांची, रोज जमावी गर्दी

नवीन रस्ता शोधत-खोदत माझे “मी” पण भेटे //
श्रमलेल्या रात्रीच्या मुठीत जपले स्वप्न छोटे
सुरुंग लावा, डोंगर फोडा जोडा नवीन घाट
पावलोपावली प्रश्न घेऊनी आली नवीन वाट
प्रत्येक सिग्नल ओळखीचा, अन् छोटेमोठे खड्डे
नेहमीच्या रस्त्याभोवती थंडगार झाडे

नवीन रस्ता शोधत-खोदत माझे “मी” पण भेटे //
सवयीच्या सुपर हायवेवर, कधीच नसतात काटे /